# ई - पोलीस पत्रिका

दि ०८/१२/२०२० अनु.क्र. २३२

## (अमरावती शहर पोलीसांची २०२० ची उद्दिष्टे)

- जागरूक व तत्पर पोलीस.
- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू

# भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा

## निलंबन

**१.क्रमांक पो.आ.अ/विचौ.-१/निलंबन/ए.सी.बी. प्र/पोउपनि-अहिरे/२०२०/६७४६/२०२०/ अम.शहर दि.२८/११/२०२०**

**निलंबन आदेश**

आपण पोउपनि गणेश अहिरे नेमणुक पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती शहर नेमणुकीस असुन तक्रारदार दिपक दौलतराव रामरखयानी वय ५१ वर्षे रा. प्रित रेसीडेन्सी जुना बायपास रोड गौड बाबा मंदीराजवळ अमरावती यांनी पो.स्टे.गाडगेनगर येथे दिनांक ०४/०८/२०२० रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान **तक्रारदार यांना पो.स्टे.गाडगेनगर येथे बनावट दारुच्या गुन्ह्यात अटक करुन आरोपी न करण्याकरीता** आपण आणी आपले खाजगी सहकारी पप्पु रावलानी रा. अमरावती यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांना २,००,००० रु.ची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १,००,०००/- रु. स्वीकारल्याचे मान्य केले.त्यानंतर दिनांक ०७/०८/२०२० रोजी आयोजीत सापळा कारवाई दरम्यान आपले सहकारी पप्पु रावलानी यांनी तक्रारदार यांचेकडुन १,००,०००/- रु. लाच स्वीकारण्याचा प्रयत्न केला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन आपले विरुध्द पो.स्टे गाडगे नगर, अमरावती शहर अप क्र. १०६३/२०२० कलम ७ ७(अ) भष्ट्राचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये दि.२८.११.२०२० रोजीचे १९.२९ वा. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी लोकसेवक यांनी स्वतःचा आर्थिक लाभ व्हावा याकरीता आपल्या पदाचा दुरुपयोग करुन कायदेशिर मोबदल्याशिवाय प्रलोभन म्हणुन तक्रारदारास लाचेची मागणी करुन आपले सहकारी यांनी लाचेची रक्कम स्विकारली. सदरची बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असुन शिस्तप्रिय पोलीस खात्यास अशोभनिय आहे.

**उपरोक्त कर्तव्यावरील आपण पोलीस विभागात जबाबदार पोलीस अधिकारी या पदावर कार्यरत असुन आपणास कायद्याचे परिपुर्ण ज्ञान असुन सुध्दा आपण गंभीर गैरवर्तनाचे कृत्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा जनसामान्य मानसात मलीन झाली आहे. म्हणुन आम्ही आपणास महाराष्ट्र मुंबई पोलीस कायदा १९५१ मधील नियम २५ मधील १ (ख) आणि मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपील) १९५६ नियम ३ (१) (अ-२) (१-अ) (अ) च्या तरतुदीनुसार तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील प्रकरण दोन मधील नियम २.२ (अ) च्या तरतुदी नुसार गुन्हा दाखल झाल्याचे दिनांक (दि. २८.११.२०२०) पासुन चौकशीच्या अधिन राहुन शासन सेवेतुन निलंबित करण्यात येत आहे.**

**महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहणअवधी, स्वियेत्तर सेवा आधि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८ नुसार निलंबनाच्या आदेश अस्तित्वात असे पर्यत तीन महाने पावेतो त्यांना अर्धपगारी वेतना इतका उदरनिर्वाह भत्ता व त्यावर मिळणारे दरमहा इतर भत्ते अनुज्ञ**

**ोय राहतील.तसेच निलंबनात ३ महिण्याचा कालावधी पुर्ण झाल्यावर त्यांनी खाजगी नोकरी अथवा उद्योग धंदा केला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केल्यानंतर त्यांचा निर्वाह भत्ता वाढवुन देण्याबाबत विचार करण्यात येईल.**

सदर निलंबनाचा आदेश अस्तित्वात असे पर्यत आपणास कोणत्याही प्रकारचा खाजगी उदयोग अथवा नोकरी करता येणार नाही. जर या कालावधीत त्यांनी कोणतीही खाजगी नोकरी अथवा उदयोग केला असल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तनुक)नियम १९७९ च्या अंतर्गत शिस्तभंगाविषयक कार्यवाहीस पात्र राहाल.

निलंबन कालावधीत तुमचे मुख्यालय हे पोलीस मुख्यालय अमरावती शहर येथे राहिल. तुम्हास आमचे पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच त्यांना सकाळी व सायंकाळी आपल्या मुख्यालयात हजरी देणे अनिवार्य राहील.

**२.क्र.पोआअ/आस्था/वे.नि./सु.वे.नि./३०३/६८९७/२०२०अमरावती शहर शहर दि.०३/१२/२०२०**

**आदेश**

पोलीस हवालदार/३०३ मिलींद धरमदास तायडे, नेमणुक मोटर परिवहन विभाग, अमरावती शहर यांना या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ / विचौ-१/ कसुरी/अंआ/चापोहवा /३०३ तायडे/३६६३ / दि.३०.०६.२०२० अन्वये **देय वार्षिक वेतनवाढ एक वर्ष रोखण्याची (पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता ) ही शिक्षा देण्यात आली आहे.परंतु सदर कर्मचारी यांचा शिक्षेचा आदेश आस्थापना शाखेला टपालाने उशिरा प्राप्त झाला असल्याने** त्यांना त्यांना या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/आस्था/वे.वाढ-२०२०/३७७९/२०२० दिनांक ०६ जुलै २०२० अन्वये वार्षिक वेतनवाढ दिनांक ०१.०७.२०२० ची वार्षिक वेतनवाढ मंजुर करण्यात आलेली आहे.परंतु सदर कर्मचारी हे शिक्षाधिन असल्याने **सदरची वेतनवाढ रद करुन खालील प्रमाणे सुधारीत वेतननिश्चिती करण्यात येत आहे.तसेच सदर वेतनवाढीची रक्कम त्यांचे माहे जुलै -२०२० मध्ये अदा करण्यात आली असल्यास ती वसुल करण्यात येईल.**

| **वेतवाढीचा दिनांक** | **विद्यमान पे मॅक्ट्रीक लेव्हल नुसार वेतननिश्चिती** | **वेतनवाढीवा दिनांक** | **सुधारीत पे मॅक्ट्रीक लेव्हल नुसार वेतननिश्चिती** |
|---|---|---|---|
| **१-७-२०१९** | **रु.४२३०० एस-९** | **०१-०७-२०१९** | **रु.४२३०० एस-९** |
| | **रु.४३६०० एस-९** | ०१-७-२०२० | रु.४२३०० एस -९ प्रत्यक्ष देय वेतन आदेश क्र.पोआअ/विचौ-१/कसुरी/अंआ/चापोहवा/३०३ तायडे/३६६३/ दि.३०.०६.२०२० अन्वये,देय वार्षिक वेतनवाढ एक वर्ष रोखण्याची (पुढील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वेतनवाढीवर परिणाम न होता) ही शिक्षा देण्यात आल्याने वेतनवाढ देय नाही. |

## स्थावर मानमत्ता

**३.क्र.पोआअ/आस्था-८/ स्थावर मालमत्ता परवानगी /६८१७/२०२० अमरावती शहर दि.०२/१२/२०२०**

**संदर्भ :-** पोशि/१० केशव निकम नेमणुक मोटार परिवहन विभाग अमरावती शहर

## आदेश

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर आस्थापनेवरील पोशि/१० केशव निकम नेमणुक मोटार परिवहन विभाग अमरावती शहर यांना त्यांचे नावे प्लॉटही स्थावर मालमत्ता संपादीत करण्याची परवानगी मिळणेबाबत अर्ज सादर केला असुन त्यांचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | स्थावर मालमत्ता धारकाचे नाव | श्री. सुनिल शामराव चक्रे वय, ५२ वर्षे, व्यवसाय नौकरी, रा. एस.आर.पी.कॅम्प, अमरावती. |
| २ | स्थावर मालमत्तेचे वर्णन | मौजा-म्हसला प्रगणे-नांदगाव पेठ ता.जि. अमरावती येथील शेत सवे नं.२०/१० मधील रे.के.नं एन.ऐ.पी.३४/ म्हसला ४७/१९८९ ९० नि.ता. १७.०६.१९९३ नुसार लेआऊट कन्वहर्शन मंजुर सेक्टर सी.पार्ट २ माधवी विहार मंजुर झालेल्या जागेतील प्लॉट क्र.६३ ( त्रेसष्ट) यांचे एकुण क्षेत्र फळ १९८ चौ .मि. (२१३४.३ चौ फुट) आहे.यापैकी उत्तर दक्षिण वाटणीचा पयिचमे कडील भाग यांची साईज मंजुर नकाशाप्रमाणे असुन याचे एकुण क्षेत्र फळ ११०० चौ.फुट (१०२.२३.चौ.मि.) आहे. |
| ३ | स्थावर मालमत्ता खरेदीव्दार संपादित करण्यासाठी ठरविलेली रक्कम | रुपये १३,२०,०००/- ( अक्षरी- तेरा लाख विस हजार रुपये फक्त) |
| ४ | आगाऊ ईसार दिलेली रक्कम | ३,२५,०००/- (तिन लाख पंचविस हजार रुपये) |
| ५ | स्थावर मालमत्ता खरेदीव्दारे संपादीत करण्यास जमविलेल्या | रु.९,९०,०००/- ( अक्षरी- रुपये नऊ लाख नव्वद हजार ॲक्सीस बॅंकेचे स्वतःचे नावे लोन) |

| | | |
|---|---|---|
| | रकमेचा तपशिल | रु.३,२५,०००/- (अक्षरी रुपये तिन लाख पंचविस हजार स्वत: जवळील पगारातुन बचत) |
| ६ | शासकीय कर्मचाऱ्याने सदाची स्थावर मालमत्ता पूर्व परवानगी घेण्यापुर्वी खरेदी केली काय.किंवा पुर्व परवानगी घेवुन खरेदी करणार आहे. पूर्वीची खरेदी केली असल्यास दिनांक | पूर्व परवानगी घेवुन खरेदी करणार आहे. |

# वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा

**सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नांव पोलीस स्टेशनचे नोटीस बोर्डवर लिहुन हार्दीक शुभेच्छा द्याव्यात.**

| **अ.क्र.** | **हुददा** | **ब.न.** | **अधि.व कर्म.यांचे नांव** | **नेमणुक पो.स्टे** | **वाढदिवसाचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोहवा | ९३० | गणेश सुने | महिला सेल | ०८/१२/२०२० |
| २ | पोना | ३७ | ओमप्रकाश सुरकार | पोलीस मुख्यालय | ०८/१२/२०२० |
| ३ | पोशि | १३०९ | सादिक हुसेन | बीडीडीएस | ०८/१२/२०२० |
| ४ | मपोना | १३३९ | अनिता बेठे | पो.स्टे.गाडगे नगर | ०८/१२/२०२० |
| ५ | पोशि | १८२३ | कुनाल बरडे | पो.स्टे.भातकुली | ०८/१२/२०२० |

**(अशोक लांडे)**
प्र.सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त,अमरावती शहर करिता

प्रत,

पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक ,आस्थापना शाखा/सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती व आवश्यक कार्यवाही करीता.